**प्रेसनोट दि.०७/०८/२०१९**
**गहाळ झालेले पाकीट इसमास ऐवजासह परत मिळवुन दिले.**
**शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर**

दि.०४/०८/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजताचे दरम्यान शिवाजीनगर एस.टी. स्टॅण्ड येथे पेट्रोलिंग करीत असताना दामिनी शिवाजीनगर/डेक्कन येथील मपोशि.७९९५ एस.ए. वलेकर व मपोशि.१८४८ व्ही.आर.दुरगुडे यांना बिनधनी जेन्टस पॉकेट मिळाले होते. त्याबाबत शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे स्टेशन डायरीला नोंद करण्यात आली असून,सदर पॉकेट मधील मेडिकलची पावती वरून पॉकेट धारकाचा मोबाईल क्रमांक मिळाल्याने, त्यावरून आम्ही सदर मोबाईल धारकाला संपर्क साधला असता, त्यांना पोलीस स्टेशन येथे बोलावून घेतले व त्यांच्याकडे सापडलेल्या पाकिटाबाबत चौकशी करता त्यांनी आपले पाकिट शिवाजीनगर एस. टी. स्टॅण्ड भागात पाकिट हरविले असलेबाबत सांगितले असता, त्यांना त्यांच्या पाकिटाचे वर्णन व आतील वस्तू बाबत विचारणा केली असता, त्यांनी त्यांच्या पाकिटाचे वर्णन व आतील वस्तू सांगितले असता, त्यांच्या पाकिटाचे वर्णन व त्यामध्ये असलेल्या वस्तूचे वर्णन यांची खात्री केली असता, ते त्याचे हरविलेले पाकिट असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांच्या ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरबाबत वपोनिरी.बाळासाहेब कोपनर यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनिरी.झडते मॅडम, मपोशि.७९९५ एस.ए.वलेकर व मपोशि.१८४८ व्ही.आर.दुरगुडे, मपोना.७१६१ वंजारे यांनी मदत केल्याने याचे मदतीने आम्ही चांगले काम केले आहे.

